**सुभाषित :**

सन्तप्तायसि संस्थितस्य पयसो नामापि न ज्ञायते
मुक्ताकारतया तदेव नलिनीपत्रस्थितं राजते ।
स्वात्यां सागरशुक्तिमध्यपतितं सन्मौक्तिकं जायते
प्रायेणोत्तममध्यमाधमदशा संसर्गतो जायते ॥

**अर्थ :**

तापलेल्या लोखंडावर पडलेल्या पाण्याचा मागमूस सुध्दा राहात नाही. (पण) तेच पाणी जर कमळाच्या पानावर असले तर मोत्याच्या आकाराचे (सुंदर) दिसते. तेच (पाणी) स्वाती नक्षत्राच्या पावसात समुद्रात दोन शिम्पल्यांमध्ये पोचले तर त्याचा सुंदर मोती तयार होतो. सामान्यतः उत्कृष्ट, मध्यम आणि हीन अशा अवस्था सहवासामुळे लाभत असतात.